# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक २५६०११५४,
२५६०११६०,
६५००३७००
६५००३७०१

गणेशखिंड, पुणे ४११००७

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०– २५६०११५४

संदर्भ क्र.:विकमं/२०१२–१३/२३३

दिनांक : २३/०७/२०१२

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय : सन २०१२–१३ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी सुरक्षा विमा निधी आणि आपत्कालीन निधी यांचे शुल्क पाठविण्याबाबत...

महोदय/महोदया,

या पत्राद्वारे आपणांस कळविण्यात येते की, सन २०१२–१३ या शैक्षणिक वर्षात विविध वर्गांमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांकडून आपण विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी सुरक्षा विमा निधी आणि आपत्कालीन निधी यांचे शुल्क आकारले असेलच, तरी कृपया सदर शुल्कापैकी विद्यापीठाचा विद्यापीठास देय असलेली रक्कम धनाकर्षाद्वारे मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७. यांच्याकडे पाठवावी.

१. धनाकर्ष (डी.डी.) **'मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ'**, पुणे यांचे नावाने काढावा.

२. विद्यापीठास देय असलेली रक्कम खालील प्रमाणे :–
   अ) विद्यार्थी कल्याण निधी प्रति विद्यार्थी रु. २०/–,
   ब) विद्यार्थी सुरक्षा विमा निधी प्रति विद्यार्थी रु. १०/–
   क) आपत्कालीन निधी प्रति विद्यार्थी रु. १०/– याप्रमाणे
   **प्रति विद्यार्थी रु. ४०/– याप्रमाणे एकत्रित** धनाकर्ष पाठवावा.
   **(धनाकर्ष (डी.डी.)च्या मागे महाविद्यालयाची मोहोर आय. डी. (I.D.) नंबरसह आवश्यक)**

३. **धनाकर्ष पाठवित असतांना त्यासोबत महाविद्यालया/संस्थेच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे पत्र असावे.**

४. **पत्रामध्ये विविध शाखांमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची विद्यार्थी संख्या नमूद करावी व सोबत यादी जोडावी.**

सदर शुल्क पाठविण्याची अंतिम मुदत **सोमवार, दि. १७ सप्टेंबर, २०१२** आहे. तरी कृपया वर नमूद केलेल्या निधींचे शुल्क पाठविण्यासंबंधीची कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे

23/07/2012

(डॉ. पंडित एन. शेळके)
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

(टीप : अधिक माहितीसाठी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या विविध योजना व उपक्रम मार्गदर्शिका पान क्र.७ व ८ पहावी.)